## प्रेस नोट ता. २६/०६/२०२०

## ट्रॅक्टर चोरणाऱ्या सोलापुर/उस्मानाबाद जिल्हातील टोळीच्या गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी-चिंचवडने आवळल्या मुसक्या

दि. ०९/०६/२०२० रोजी रात्री ०३:०० वाजता बोडकेवाडी, फेज २, हिंजवडी, पुणे येथुन शेतीसाठी लागणारा जॉन डियर कंपनीचा ३,००,०००/- रुपये किंमतीचा ट्रॅक्टर अज्ञात चोरटयाने चोरी करुन नेला म्हणुन हिंजवडी पोलीस ठाणे येथे दि. १६/०६/२०२० रोजी गु.र.नंबर- ३५६/२०२० भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मा.पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेस सदर गुन्हयाचा समांतर तपास करुन गुन्हा उघडकिस आणण्याचे आदेश दिल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मोहन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-४ च्या पथकातील पोना/ वासुदेव मुंडे व पोशि/ धनाजी शिंदे यांनी घटनास्थळाचे कसोशिने तांत्रिक विश्लेषण करुन सदर ट्रॅक्टर हा हिंजवडी येथुन हडपसरच्या दिशेने गेल्याचे तसेच आरोपीतांनी ट्रॅक्टर चोरी करण्यासाठी येताना व जाताना मोटारसायकल वापरली असल्याचे निष्पन्न केले. तेव्हा सदरची मोटारसायकल ही इसम नामे सागर कुमार हवाळे रा. लोणी ता. परांडा. जि. उस्मानाबाद याचे नावावर असल्याचे समजताच तात्काळ सदर ठिकाणी पुढील तपासासाठी सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख हे पथकासह रवाना झाले. सदर पथकाने उस्मानाबाद व सोलापुर परिसरात गुप्तपणे ०३ दिवस राहुन सखोल तपास करुन दि. २४/०६/२०२० रोजी इसम नामे सागर कुमार हवाळे वय-१९ वर्षे यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याने हा गुन्हा त्याचे साथीदार नामे १) करण तानाजी वायकर रा. पिंपरी (पा) पोस्ट साकत ता. परांडा जि. उस्मानाबाद २) राहुल म्हसु शिंदे रा. लोणी ता. परांडा जि. उस्मानाबाद ३) तुषार भारत शिंदे रा. लोणी ता. परांडा जि. उस्मानाबाद व तुषार याचे इतर ०२ मित्र असे सर्वांनी मिळुन केल्याचे निष्पन्न केले. सागर यास ताब्यात घेतल्याची बातमी इतर आरोपीन पर्यत पोहचल्याने ते फरार झाले होते. तरी सुद्धा गेलेल्या पथकाने आरोपी नामे करण वायकर यास बार्शी तालुक्यातील एका गावातुन तो शेतात लपलेला असताना सापळा रचुन ताब्यात घेतले. नमुद दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेवुन पुणे येथे आणुन त्यांच्या इतर साथीदारांचा शोध घेवुन त्यातील राहुल म्हसु शिंदे यास चिंचवड परिसरातुन ताब्यात घेतले सदर तिन्ही आरोपीतांकडे कसुन चौकशी करता त्यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न करुन त्यांनी सदरचा ट्रॅक्टर हा त्यांचा मित्र नामे गोकुळ धोंडीराम पवार रा. कुसळंब ता. पाटोदा जि. बीड हल्ली राहनार भेकराईनगर फुरसुगी पुणे यास ६०,०००/- रुपये किंमतीत विकला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याच्या कडुन चोरीस गेलेला ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. सदर ०४ ही आरोपीतांना पुढील तपासकामी हिंजवडी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास हिंजवडी पोलीस ठाणे करत आहेत.

सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपी पैकी आरोपी नामे राहुल शिंदे व तुषार शिंदे हे उस्मानाबाद जिल्हातील रेकॉड वरील गुन्हेगार असुन त्यांच्या विरुद्ध मारामारीचे व स्त्री अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ संजय गवारे, नारायण जाधव, प्रविण दळे, धर्मराज आवटे, पोना/ संतोष असवले, वासुदेव मुंडे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, तुषार शेटे,

पो.शि. शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, तुषार काळे, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, तांत्रिक विश्लेषन विभागाचे नागेश माळी व राजेंद्र शेटे यांनी केली आहे.

